**रेडिओ मेकॅनिक इलेक्ट्रिशियन** पदाची
दि.०१/०१/२०१८ रोजीची प्राथमिक सेवाजेष्ठतासूची
प्रसिध्दीबाबत.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**
**पिंपरी - ४११०१८.**
**क्र.प्रशा/१२/कावि/ १०९८ /२०१८**
**दिनांक : २७ / ११ /२०१८**

वाचले क्र.१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, मंत्रालय, मुंबई ४०००३२ दिनांक २१/१०/२०११

२) अधिकार प्रदान आदेश क्र. प्रशा/१/कावि/११७५/२०१३ दि. २९/८/२०१३

३) आदेश क्र. प्रशा/१२/कावि/**१८०**/२०१७ दि.**१५/०३/२०१७** अन्वये दि.०१/०१/२०१५ रोजीची **रेडिओ मेकॅनिक इलेक्ट्रिशियन** पदाची अंतिम सेवाजेष्ठतासूची

४) मा.आयुक्त सो. यांचेकडील परिपत्रक क्र.प्रशा/७/कावि/६५/१२ दि. १९/१/२०१२

५) मा.आयुक्त सो. यांचेकडील परिपत्रक क्र.प्रशा/७/कावि/६३५/१३ दि. ३१/५/२०१३

६) प्रशासन विभागाकडील **दि. २२ / ११ /२०१८** चा मान्य प्रस्ताव

## आदेश

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर **रेडिओ मेकॅनिक इलेक्ट्रिशियन** पदाची दि.०१/०१/२०१५ अखेरची अंतिम सेवाजेष्ठतासूची वाचले क्र.३ अन्वये प्रसिध्द करणेत आली होती. सदरची दि.०१/०१/२०१५ अखेरची अंतिम केलेली सेवाजेष्ठता व त्यानंतर दि.०१/०१/२०१५ ते दि.३१/१२/२०१७ या कालावधीत संबंधित वर्षात नियमित पदोन्नती, सरळसेवा वा अन्य विहित मार्गाने नियुक्त अधिकारी / कर्मचाऱ्यांची एकत्रित **दि.०१/०१/२०१८** रोजीची **रेडिओ मेकॅनिक इलेक्ट्रिशियन** पदाची प्राथमिक सेवाजेष्ठतासूची या आदेशान्वये प्रसिध्द करण्यात येत आहे. त्यानुसार ---

१) प्राथमिक सेवाजेष्ठतासूचीमधील नमुद कर्मचाऱ्यांनी स्वत:चे नावाबाबत, जात, प्रवर्ग, जन्मतारीख, शैक्षणिक अर्हता, रुजू तारीख, जेष्ठता क्रम, नियुक्तीचा मार्ग, सेवानिवृत्ती दिनांक अथवा जेष्ठतासूचीमध्ये नांव नसलेबाबत काही आक्षेप असल्यास त्याबाबत संबंधित कर्मचाऱ्यांनी आपला आक्षेप लेखी निवेदन सादर करून ही तात्पुरती अतिरिक्त प्राथमिक जेष्ठतासूची प्रसिध्द झाल्यापासुन प्रशासन विभागाकडे **३० दिवसाचे** आत संबंधित शाखाप्रमुखांमार्फत योग्य त्या पुराव्यासह सादर करावा.

२) आक्षेप मुदतीत सादर न केल्यास किंवा आक्षेपासोबत योग्य ते पुरावे सादर न केल्यास अशा अपुर्ण आक्षेपांचा विचार केला जाणार नाही.

३) सर्व शाखाप्रमुखांना कळविण्यात येते की, ही प्राथमिक सेवाजेष्ठतासूची त्यांनी त्यांच्या विभागातील सर्व संबंधित कर्मचाऱ्यांना तात्काळ बजावुन त्यांना प्रत मिळालेबाबत दिनांकीत स्वाक्षांकित **पोहोच ८ दिवसाचे** आत प्रशासन विभागास सादर करावी. तसेच त्यांनी सदर जेष्ठतासूची त्यांच्या कार्यालयाच्या सुचना फलकावर प्रसिध्द करावी.

४) संबंधित कर्मचाऱ्यांनी सादर केलेले आक्षेप शाखाप्रमुखांनी स्वयंस्पष्ट शिफारसीसह / अभिप्रायासह व कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या पुराव्यांची खातरजमा करूनच आवश्यकता असलेस सेवानोंद पुस्तकातील नोंदीसह सर्व पुरावे सत्यप्रती करून मुदतीत प्रशासन विभागाकडे सादर करावे.

५) प्राथमिक सेवाजेष्ठतासूची प्राप्तच झाली नाही किंवा मुदतीत आक्षेप सादर करूनही शाखाप्रमुखांनी मुदतीत आक्षेप प्रशासन विभागाकडे सादर न केल्यास अंतिम सेवाजेष्ठतासूची प्रसिध्दीनंतर काही वाद निर्माण झाल्यास उक्त संदर्भ क्र.४ अन्वये याबाबतची संपुर्ण जबाबदारी शाखाप्रमुखांची राहील.

६) या प्राथमिक सेवाजेष्ठतासूचीत काही वास्तविक चुका असल्यास उदा. नाव समाविष्ठ नसणे, आडनावात / आद्याक्षरात / जन्मतारखेत चुका आढळुन आल्यास त्या शाखाप्रमुखांनी निदर्शनास आणाव्यात, म्हणजे जेष्ठतासूची अंतिम करताना त्या दुरूस्त करण्यात येतील.

७) सदरची जेष्ठतासूची महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियमन) नियम १९८२ दि.२१ जुन १९८२ मधील तरतुदींच्या अनुषंगाने तसेच सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दि.२१/१०/२०११ मधील सुचनांनुसार तयार करण्यात आली आहे.

८) ही प्राथमिक सेवाजेष्ठतासूची मे.न्यायालयात दाखल केलेल्या अन्य कोणताही विशेष निर्वाणी अर्ज/याचिकेवरील निर्णयामुळे पुर्वीची अथवा या जेष्ठतासुचीत बदल करावा लागेल, त्या निर्णयाच्या अधिन राहुन असेल.

सही/-
सहाय्यक आयुक्त, प्रशासन
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८.

प्रतः- संबंधित विभाग

२/- सदर आदेश व सेवाजेष्ठतासूची मनपाच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली असून सदरची प्रत संबंधित कर्मचाऱ्यांचे निदर्शनास आणुन द्यावी. प्राथमिक सेवाजेष्ठतासूची संबंधित कर्मचाऱ्यांना तात्काळ बजावुन त्यांना प्रत मिळालेबाबत दिनांकीत स्वाक्षांकित **पोहोच ८ दिवसाचे** आत प्रशासन विभागास सादर करावी. प्राथमिक सेवाजेष्ठतासूची प्राप्तच झाली नाही किंवा मुदतीत आक्षेप सादर करूनही शाखाप्रमुखांनी मुदतीत आक्षेप प्रशासन विभागाकडे सादर न केल्यास अंतिम सेवाजेष्ठतासूची प्रसिध्दीनंतर काही वाद निर्माण झाल्यास उक्त संदर्भ क्र.४ अन्वये याबाबतची संपुर्ण जबाबदारी शाखाप्रमुखांची राहील.

प्रशासन अधिकारी, (२)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८.

D:\sevajestata\सन 2018\Class 3\02 रेडीओ मेकॅनिक इलेक्ट्रीशियन\प्राथमिक आदेश वर्ग 2.doc2

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी 411 018

## रेडिओ मेकॅनिक इलेक्ट्रीशियन पदाची दि.01/01/2018 रोजीची प्राथमिक सेवाजेष्ठतासूची प्रसिध्दीबाबत

वेतनश्रेणी :- 4500-7000 ग्रेड वेतन : 2800

| अ.क्र. | संगणक क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | जात | प्रवर्ग | शैक्षणिक पात्रता | जन्म दिनांक | रेडिओ मेकॅनिक इलेक्ट्रीशियन पदाची रुजू तारीख | नियुक्तीचा मार्ग (पदोन्नत/ सरळसेवा/ मर्यादीत विभागीय परिक्षा) | मनपामध्ये कामास लागलेचे | | सेवानिवृत्ती दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | पद | तारीख | | |
| 1 | 5042 | वाळुंज लहानु फक्कड | मराठा | खुला | बी.कॉम., आय.टी.आय., वायरलेस मेकॅनिक कम ऑपरेटर कोर्स | 01/06/1965 | 01/09/1994 | पदोन्नती | वायरलेस ऑपरेटर | 20/09/1988 | 31/05/2023 | मानीव दिनांक |
| 2 | 5049 | कांबळे नागनाथ आण्णा | मांग | अनुसुचित जाती | बी.कॉम., तांत्रीक व्यवसायिक परीक्षा उत्तीर्ण, तीन वर्षाचा व्यावसायिक तांत्रीक कोर्स उत्तीर्ण, वायरलेस मेकॅनिक कम ऑपरेटर २ वर्षाचा कोर्स, बारावी शास्त्र नंतर व्यावसायिक तांत्रीक कोर्स उत्तीर्ण, आयटीआय पुणे विद्यापीठाकडील ऑफीस मॅनेजमेंट अँड बिझनेस करस्पाँडस् कोर्स उत्तीर्ण , एम.एस.-सीआयटी कोर्स उत्तीर्ण. | 01/06/1961 | 01/09/1994 | पदोन्नती | वायरलेस ऑपरेटर | 19/09/1988 | 31/05/2019 | मानीव दिनांक |

प्रशासन अधिकारी (2)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी 411 018

सही/-
सहाय्यक आयुक्त, प्रशासन
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी 411 018